# प्रेसनोट

-------------

**शटर उचकटुन घरफोडी चोरी करणारे टोळीतील तीन आरोपी जेरबंद घरफोडी व वाहनचोरी सह चार गुन्हे उघड रोख, डी.जे ॲम्पीफायर साहीत्य,वाहनासह ९९,५००/- रुपयाचा ऐवज हस्तगत**

---

श्री इजाज ख्वाजा शेख, वय ३६ वर्षे, रा. न्यू भिमराज तरुण मंडळ, कासेवाडी, ३११, भवानी पेठ, पुणे यांचे साऊंड सिस्टीम व डेकोरेशनचे साहीत्य ठेवलेले राजीव-गांधी हौसींग सोसायटी, कासेवाडी, ५२७, भवानी पेठ, पुणे येथील दुकान नं. २४, हे कुलुप लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने सदर दुकानाचे शटर उचकटून दुकानातील एकुण ६५,००० रु.किंमतीचे साउंडचे साहीत्य नेले म्हणून त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील अधिकारी व कर्मचारी गुन्हयाचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी इम्रान नदाफ यांना त्यांचे बातमीदारामार्फत मिळालेले बातमीवरुन आरोपी **१) लतिफ शेख, वय १९ वर्षे, रा. राजीव गांधी हौसिंग सोसायटी, सी बिल्डींग, रुम नं. ७०७, कासेवाडी, भवानी पेठ, पुणे २) अमन समीर शेख, वय १८ वर्षे ३ महिने, रा. चमनशा दर्ग्याजवळ, एकमिलाप फेंडस् सर्कल, कासेवाडी भवानी पेठ, पुणे ३) तेडा अमन ऊर्फ फारुक शाबीर रंगरेज, वय २७ वर्षे, रा. राजीव गांधी हौसिंग सोसायटी, बी बिल्डींग, रुम नं. २१३, कासेवाडी, भवानी पेठ, पुणे** यांना सापळा रचून पकडून त्यांचेकडे तपास करता त्यांनी गुन्हा केलेचे कबुल केलेने व तसे तपासात निष्पन्न झालेने त्यांना न्यायालयात हजर करुन त्यांची पोलीस कोठडीची रिमांड घेवून त्यांचेकडे सखोल तपास करता त्यांनी टिळक रोडवरील रेमंड शोरुम दुकानाचे शटर उचकटुन चोरी करुन तेथील रोख रक्कम चोरल्याचे उघडकीस आले आहे.तसेच आरोपी **लतिफ शेख याचेकडे तपास करता त्याने शंकरशेठ रोड व बुधवार पेठ येथुन अनुक्रमे ऐव्हीएटर मोपेड व हिरो होंडा** चोरल्याचे निष्पन्न झालेने वरील **आरोपींकडुन रोख रक्कम, डी.जे ॲम्पीफायर साहीत्य, दोन वाहने असा ९९,५००/- रुपयाचा माल हस्तगत करण्यात करुन खडक पोलीस ठाणे कडील दोन घरफोडी चोरीचे, एक वाहन चोरीचा व फरासखाना पोलीस ठाणे कडील एक वाहन चोरीचा असे एकुण चार गुन्हे उघडकीस आणणेत आलेले आहेत.**

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. सुहास बावचे, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री विजयकुमार शिंदे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक वैभव पवार व तपास पथकातील कर्मचारी विश्वनाथ शिंदे, विनोद जाधव, शाम लोहोमकर, इम्रान नदाफ, संदीप कांबळे, गणेश माळी, समीर माळवदकर, राकेश क्षीरसागर, आशीष चव्हाण, तानाजी सरडे यांनी केलेली आहे.